पुढारी

# यशोदाचा 'सायबर सेफ राजधानी सातारा' उपक्रम यशस्वी

सातारा : पुढारी वृत्तसेवा

यशोदा टेक्निकल कॅम्पस येथील संगणक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी राबवलेला 'सायबर सेफ राजधानी सातारा' हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. हा उपक्रम क्विक हिल फाऊंडेशन व महाराष्ट्र पोलिस सायबर सेल यांच्या सहकार्याने राबवण्यात आला.

यशोदा टेक्निकल कॅम्पसतर्फे आयोजित आरंभ २०२५ या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पथनाट्य, घोषवाक्य, माहिती पत्रके व तंत्रज्ञानविषयक प्रात्यक्षिकांमधून सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. इंटरनेट हॅकर्सचे शिकार होण्यापासून वाचण्यासाठी ओटीपी व आधार क्रमांक शेअरींग न करणे, मजबूत पासवर्डचा वापर, संशयास्पद लिंक्स टाळणे, सोशल मीडियावर वैयक्तिक माहितीची गोपनीयता राखणे इत्यादी बाबींवर भर देण्यात आला. या उपक्रमात प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, डॉ. सरिता बलशेटवार, प्रा. शीतल वाघमारे यांचाही सहभाग होता.



सातारा: सायबर सेफ राजधानी सातारा उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक.

> सायबर सुरक्षा ही केवळ वैयक्तिक गरज नसून सामाजिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांचा समाजासाठी पुढाकार घेतला. हा उपक्रम केवळ महाविद्यालयीन पातळीवर न राहता, साताराच्या तरुणांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.
>
> -प्रा. अजिंक्य सागरे, उपाध्यक्ष यशोदा इन्स्टिट्यूट

Satara Edition
Oct 10, 2025 Page No. 10
Powered by: erelego.com